
# संत समर्थ रामदासस्वामी यांचे नेतृत्वविषयक विचार, अर्थात, 'दासबोध' ग्रंथातील व्यवस्थापनशास्त्र विषयक संकल्पना



**पार्श्वभूमी :**

संत रामदास हे शिवाजी महाराज व संत तुकाराम यांचे समकालीन, त्यांना समर्थ या नावाने महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात व परदेशातही ओळखले जाते. इ. स. १६०८ साली जन्म व इ.स. १६८२ साली निर्वाण या ७४ वर्षांच्या आयुर्मानात संत रामदासांनी अध्यात्मिक क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात जे अपूर्व योगदान दिले, त्यामुळेच त्यांच्या हयातीतच त्यांना लोक 'समर्थ' म्हणजे एक मोठा किंवा सक्षम (able) नेता (Leader) म्हणून ओळखू लागले व त्यांना समर्थ हेच नाव जास्त शोभू लागले. ते त्यांची नेता म्हणून किंवा संघटनात्मक भव्य व यशस्वी कार्य केल्यामुळेच ! समर्थ रामदासांचे आयुष्याचे तीन मुख्य भाग इतिहासात सांगतात. त्यातील पहिली १२ वर्षे बालपणाची. ज्या वेळी 'सावधान' शब्द कानावर पडल्यानंतर जे लग्नमंडपातून पळून गेले व एक लक्षावधी लोकांचा मोठा संघटनात्मक संसार करण्यासाठी जणू काही ही योजना होती. एकाने मला विचारले की, ''का हो! रामदास स्वामी बोहल्यावरून पळून गेले व स्वतःच संसारातून बाजूला गेले. असे असताना आपल्याला ते 'संसार कसा नेटका करावा' हे कसे सांगतात?'' त्याला उत्तर असे की, ''आपल्या सामान्य माणसांच्या संसाराच्या कल्पना संकुचित असतात. नवरा, बायको, मुले, फार झाले तर आई-वडील, या पलीकडे आपली संसाराची कल्पना जात नाही. 'समर्थांसारख्याने वयाच्या ८ व्या वर्षी आईने, शांत काय बसलास व विचार कसला करतो आहेस?' अशा प्रश्नाला 'आई! चिंता करतो विश्वाची' असे उत्तर दिले. वयाच्या ८ व्या वर्षी आपल्याला आयुष्यात काय करायचे आहे याचे स्पष्ट चित्र ज्याच्यापुढे होते, अशा दूरदृष्टी असणाऱ्या असामान्य व्यक्तीचा 'संसार' खूप मोठा असतो व त्यांनी अतिशय भव्य व नेटका/उत्तम गुणवत्तेचा कसा व का केला हे थोडक्यात आपण पाहू.

श्रीनिवास रायरीकर

समर्थ रामदासांच्या दासबोधासारख्या 'ग्रंथराज' समजल्या जाणाऱ्या ग्रंथात उत्तम नेतेपदाची लक्षणे काय, उत्तम कार्यकर्ता कसा असतो, उत्कृष्ट कार्यसंस्कृतीचे व गुणवत्तेच्या कामाचे निकष काय, संघटन म्हणजे काय, ते वाढवायचे कसे, बांधायचे कसे, (Team Work) संघकार्य करताना कसे वागावे व कसे वागू नये, संघबांधणी (Team Building) कशी करावी, Deligation कसे करावे, नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी कसे वागले पाहिजे, त्यांच्यात कोणती Interpersonal व संवादाची कौशल्ये हवीत, त्यांची भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) कशी हवी, नेत्याने 'निःस्पृहता' ठेवून भव्य काम कसे उभे करावे किंबहुना (Golbal) जागतिक पातळीवर भव्य संघटन यशस्वीपणे कसे चालवावे, हेच नव्हे, तर व्यवस्थापनशास्त्राची आत्ताची व यापुढे येऊ घातलेली अनेक तत्त्वे दासबोधासारख्या ग्रंथात समर्थ रामदास अचूक व तपशीलात लिहू शकले, हे पाहिले की, 'दासबोध' सारखा ग्रंथ हा एखाद्या 'व्यवस्थापन' शास्त्राच्या किंवा नेतृत्व शास्त्राच्या ग्रंथामधला एखादा अव्वल दर्जाचा ग्रंथ वाटतो. हे कशामुळे, कसे व कोणते महत्त्वाचे नेतृत्व व कार्यसंस्कृतीविषयीच्या संकल्पना समर्थांनी दासबोधात मांडल्यात ते आपण पुढे काही प्रमाणात तपशीलवार पाहणार आहोत. आजच्या आधुनिक जीवनात कारखान्यांमध्ये कंपनी व्यवस्थापनात जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये आपल्या वैयक्तिक जीवनात या साऱ्याचे कसे स्थान आहे व आपल्या आधुनिक जीवनातल्या महत्त्वाच्या समस्यांना समर्थांनी 'दासबोधात' मुळातूनच उत्तरे दिली आहेत, तसेच आपला व्यक्ती, नेता, कर्मचारी, कुटुंब व समाजाचा घटक म्हणून कसा विकास साधू शकतो, हा खूप मोठा विषय आहे. मी 'Super Habits of Dasbodh' या नावाच्या कार्यशाळातून संपूर्ण दिवस ज्याचा ऊहापोह करून आपल्या प्रत्येकासाठी प्रत्यक्ष 'कृती योजना' ज्याची त्याच्याकडून करून घेत असतो. त्यात मुख्यतः कठोर आत्मपरीक्षण (Self Analysis) हे हत्यार वापरले जाते. आपल्या आयुष्याच्या सर्व अंगांना स्पर्श करून आंतर-आयुष्य, कामावरील/व्यवसायासंबंधीचे आयुष्य व परस्पर मानवी संबंधांच्या विषयीचे आयुष्य या साऱ्यांमध्ये मनाच्या खोल पातळीवर काम करून स्वतःच्या गुणदोषांचे विशेषतः दोषांचे विश्लेषण करून 'बदल व विकासाची' आत्मग्वाही (Self Commitment) देणे ह्याच बरोबर एक तपशीलवार कार्ययोजना (Action Plan) तयार करण्याचे काम करीत असतो. या Action Plan च्या अंमलबजावणीमुळे आपल्या जीवनात अनेक चांगले बदल होतात व ते मुळातून असतात. या कार्यक्रमात ISO - 9000 मधील गुणवत्ता सुधारणेच्या संकल्पना, तसेच अमेरिकन व्यवस्थापनतज्ज्ञ प्रो. डेमिंग यांची प्रसिद्ध PDCA Cycle [Plan - Do - Check - Act] अशा आधुनिक संकल्पनांचा प्रत्यक्ष उपयोग करून संपूर्ण आयुष्याचीच गुणवत्ता कशी वाढेल (ज्यावर समर्थ रामदासांचा पूर्ण भर आहे) याची अत्यंत व्यवहारी अशी योजना तयार केली जाते. या योजनेची ताबडतोब आपल्या आयुष्यात अंमलबजावणी


सुरू करणे व प्रत्यक्षात बदल व विकास घडवणे, या सूत्रावर समर्थांच्या दासबोधातील अनेक ओव्या व संकल्पनांच्या भक्कम पायावर ही कार्यशाळा आधारित आहे. तो अत्यंत तपशीलात काम करण्याचा भाग झाला. परंतु या कार्यशाळेतील समर्थ रामदासांच्या नेतृत्वविकास, कार्यसंस्कृती, संघटनात्मक विचार, व्यक्तिविकास यातील काही संकल्पना आपण आता खालील लेखात थोडक्यात पाहू.

**'दासबोध' ग्रंथातील व्यवस्थापन कौशल्य/नेतृत्व विकास विषयक मुख्य संकल्पना :**

दासबोधातल्या व्यवस्थापन व नेतृत्वविषयक संकल्पना काय आहेत हे पाहण्यापूर्वी समर्थ रामदासांच्या चरित्राचे मोजके व महत्त्वाचे टप्पे आपण आता पाहू. त्याचबरोबर 'दासबोध' ग्रंथाच्या रचनेचा अतिशय थोडक्यात परिचय करून घेऊ. सुरुवातीला सांगितले तसे, समर्थ संत रामदासांचा जन्म इ.स. १६८२ साली मराठवाड्यातील जांब या गावी झाला. त्यांचे मूळचे नाव नारायण ठोसर. वयाच्या बाराव्या वर्षी संसाराच्या पाशात न अडकता हा मुलगा मराठवाड्यातील जांब या गावापासून पायी, पळत, पोहत असा अनेक प्रकारे नाशिकजवळील टाकळी या गावी पोहचला व इ.स. १६२० ते १६३२ या १२ वर्षांच्या कालावधीत प्रखर अध्यात्मिक साधन व अध्ययन करून तसेच त्याचे इष्टदैवत श्रीरामचंद्रांचा साक्षात्कार करून आपल्या पुढील कार्याला सिद्ध झाले. रामाचे भक्त म्हणून त्यांची शेवटपर्यंत दास्यत्वाचीच भूमिका होती. सगळीकडे लोकमान्य, राजमान्य व विख्यात होऊन समर्थ 'मोठा नेता' म्हणून मान्यता पावले. तरी देखील 'रामाचा दास' नम्र भूमिका त्यांनी कधीही सोडली नाही. मोठा नेता असून अहंकाराचे वारे देखील लागून दिले नाही. संपूर्ण भारतवर्ष त्यांनी इ.स.१६३२ ते १६६४ या बारा वर्षांत पिंजून काढला. उत्तर भारतापासून दक्षिण भारतापर्यंत प्रवास करून अत्यंत जवळून राजकीय व सामाजिक स्थितीचा अभ्यास करून ते गप्प बसले नाहीत, तर त्यावर उपाय म्हणून लोकजागृती व लोकशिक्षणाची केंद्रे भारतभर उभी केली. ज्या काळात परकीय सत्ता होती, दुसऱ्या गावी जाणे देखील अवघड होते. त्या काळात संपूर्ण भारतभर ११०० मठांचे/केंद्रांचे जाळे उभारणे हे एखाद्या मोठ्या 'समर्थ' नेत्याचेच काम असू शकते. छत्रपती शिवाजी महाराजांना इ.स. १६४९ मध्ये अनुग्रह/शिष्यत्व दिले. १६७८ मध्ये छोटे २०० ओव्यांचा पण वर्तनात/वृत्तीत बदल घडविण्याचे अफाट सामर्थ्य असलेला अलौकिक 'मनोबोध/मनाचे श्लोक' ही रचना केली. इ.स. १६८२ साली ह्या महान संताने सज्जनगड (जि. सातारा) येथे आपला देह ठेवला. जेथे त्यांचे समाधीस्थान आहे.




आता मुख्यतः आपल्याला त्याचा दासबोध या ग्रंथाचा थोडक्यात परिचय करून घ्यायचाय. 'दासबोध' हा ग्रंथ हा काही पुस्तके वाचून लिहिलेला किंवा कशावर तरी भाष्य असणारा ग्रंथ नसून, ज्ञान व मुख्यतः स्वतःचा अनुभव व कार्य या आधारे लिहिलेला अलौकिक, अध्यात्मिक ग्रंथ आहे. 'आधी केले आणि मग सांगितले' असे समर्थच एके ठिकाणी म्हणतात. हा कोणत्या तरी स्थानी बसून एकटाकी लिहिलेला ग्रंथ नाही तर जसा प्रत्यक्ष स्वतःचा अनुभव व कार्य वाढेल तसा टप्प्याटप्प्याने सिद्ध केलेला ग्रंथ आहे. हा तीन टप्प्यात संत रामदासांनी सिद्ध केला. त्याचा प्रारंभ १६३२ साली व पूर्तता १६८० साली झाली. तब्बल ४८ वर्षे त्यांनी ही रचना करण्यासाठी लावली. त्याला कारण अध्यात्मिक अनुभव स्वत:ला आल्याशिवाय व व्यावहारिक/सामाजिक कार्य प्रत्यक्ष उभे करेपर्यंत ते लिहायचे नाही, हा दंडक त्यांनी पाळला. 'दासबोध' चा पहिला टप्पा म्हणजे 'जुना दासबोध किंवा २१ समासी दासबोध १६३२ साली लिहिला. ज्यात केवळ विवेक, वैराग्य व तत्सम अध्यात्मिक अनुभवाचे विषय आहेत. जसा अनुभव, ज्ञान, कार्य वाढेल तसा त्यांनी तो ७ दशकांचा (म्हणजे १० समास × ७ दशक = ७० समासांचा) विस्तारला व आपण ज्यातील ओव्या मुख्यतः पाहणार तो सध्याचा प्रचलित २० दशकांचा, म्हणजे २०० समासांचा 'दासबोध' त्यांनी इ.स.१६८० साली तब्बल ४८ वर्षांनी सिद्ध केला. ज्याच्या ७७५१ ओव्यांमध्ये समर्थ रामदासांसारख्या महान संताच्या अध्यात्मिक ज्ञानाबरोबरच व्यवहार दृष्टी, संघटनात्मक विचारधन, नेतृत्वविषयक/व्यवस्थापनविषयक संकल्पना विस्ताराने आल्या आहेत. मी अनेक वर्षांच्या अभ्यासाने २०० समासांमधील ३५ समासांचे म्हणजे जवळपास ११०० ओव्यांचे संशोधन केले आहे. ज्यात आपल्या सदरच्या लेखातील विषय म्हणजे उत्तम 'व्यवहार/व्यवस्थापन' कसे करावे इ. विषय आले आहेत.



वरील पार्श्वभूमीमध्ये आपण पाहिले की समर्थ संत रामदास हे ३५० वर्षांपेक्षा जास्त वर्षांपूर्वी 'दासबोध' व इतरत्र जे विचार मांडून गेले ते आज आपल्या आधुनिक जीवनाच्या व्यवस्थापन विषयांसह सर्व विषयांना स्पर्श करणारे आहेत व त्यातील मूलभूत - विशेषतः 'माणूस' या संकल्पनेच्या संदर्भातील अनेक समस्यांची समर्पक सोडवणूक करण्यास सक्षम आहेत. पहिला प्रश्न असा येतो की, 'दासबोध' ग्रंथात अशा कार्यसंस्कृती, संघटननेतृत्व, विकासविषयक संकल्पना येण्याचे रहस्य काय? याचे कारण असे की, संत रामदासांनी त्या काळात स्वतः फार मोठे संघटनात्मक कार्य केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात उभे केले. शिवाजी महाराजांच्या राजकीय चळवळीला पूरक असे हे कार्य म्हणजे स्वराज्याला लायक असे नेते व उत्तम कार्यकर्ते, 'माणसे' तयार करणे. उत्तर भारतापासून दक्षिण भारतात तंजावरपर्यंत

या कार्याचे जाळे त्यांनी सुमारे ११०० मठ/केंद्रे उभारून केले. ही खरी म्हणजे लोकशिक्षण व लोकजागृतीची केंद्रे होती व या द्वारा समाजात त्यांनी मोठी लोकजागृती करून हजारो नेते व लक्षावधी कार्यकर्ते तयार केले. हे एवढे मोठे Network करताना त्यांनी व्यवस्थापनविषयक अनेक तत्त्वे स्वतः वापरली व अनेक कर्तबगार नेते तयार करून त्यांच्याकरवी हे मोठे कार्य उभे केले, वाढवले व त्यांच्या पश्चात टिकवले देखील. असा हजारो नेत्यांचा नेता त्याला 'समर्थ' म्हणतात. असे महान कर्तृत्व देऊन, जगड्व्याळ, व्यापक कार्य कसे उभे करावे त्याचे एक सूत्रच दासबोधात पहायला मिळते. आज देखील एखादी जागतिक संस्था उभारताना हेच सूत्र वापरले जाते, हे आपल्या लक्षात येईल. अशी जागतिकीकरणासारख्या संदर्भातील काही सूत्रे आता आपण पाहू. त्यांचे सारे कार्य त्यांनी अशा अनेक सूत्रातून उभे केले होते व म्हणूनच ते तपशीलात हे सारे अचूक मांडू शकले. 'आधी केले व मग सांगितले' असे त्यांनी लिहून ठेवले आहे. जे त्यांनी स्वतः केले नाही, अनुभवले नाही ते कधीही ते बोलले नाहीत, ते कधीही समर्थांनी लिहिलेले नाही, मग तो अध्यात्मिक विषय असो की संघटनात्मक चळवळ व त्याची व्यवस्थापनाची सूत्रे असोत. पुढील बारकावे पाहिले की आपल्या हे सहज लक्षात येईल.

**<u>ग्लोबलायझेशन/जागतिकीकरणाच्या संदर्भात उपयुक्त विचार</u>**

१) मोठे व भव्य ध्येय हवे आणि आपल्या मोठ्या व नि:स्वार्थी कार्याने संपूर्ण जगात विख्यात व्हावे/यशस्वी व्हावे असे समर्थ दासबोधात सांगतात ते असे -

***'उत्कट, भव्य तेचि घ्यावे, मिळमिळीत अवघेचि टाकावे ।***
***निस्पृहपणे विख्यात व्हावे । भूमंडळी ।।'***

असे ते स्पष्ट सांगतात की, 'उच्च दर्जाचे/उत्कट असणारे तेवढेच घ्यावे व दुय्यम दर्जाचे, कमी प्रतीचे, मिळमिळीत, वाईट क्वालिटीचे सारे फेकून द्या आणि असे भव्य व उच्च गुणवत्तेचे काम निस्पृहपणे म्हणजे प्रामाणिकपणे Above Self करून संपूर्ण जगात यश मिळवा' हे त्यांचे विचार हे आजच्या जागतिक स्पर्धेत किती उपयुक्त व योग्य आहेत !


२) बुद्धिमत्ता वापरून साधनसामग्रीचा पूर्ण वापर करून तुम्ही याच पृथ्वीवर नव्हे, तर संपूर्ण ब्रह्मांडामध्ये विख्यात होऊ शकता असे ते पुढील ओवीमध्ये सांगतात.

***''घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रह्मांडाहून जाड ।***
***तेथे कैंचे आणिले द्वाड । करंटपण।।''***

बुद्धिमत्ता वापरून जगातच नाही, तर अखिल ब्रह्मांडात विख्यात होण्याची क्षमता असताना हे न जाणारे (द्वाड) करंटपण (कमनशिबीपणा/अपयश) तुम्ही कां आणता? असे समर्थ कळवळून सांगतात.

३) 'मीच नेता राहीन' असे म्हणणारा नेता खरा मोठा नेता नाही असे समर्थ मानतात. नेत्यांनी पुढचे नेतृत्व (New Generation Leadership) तयार केल्याशिवाय तो भव्य काम करू शकत नाही. जगात मोठे काम/ Network यशस्वीपणे कसे उभारावे. हे आणखी एक Globalisation चे सूत्र समर्थांनी सांगितले, ते असे -

***''महंते, महंत करावे । युक्ती बुद्धीने भरावे ।।***
***जाणते करून विखरावे । नाना देसी।।''***



अतिशय स्पष्ट शब्दात ते सांगतात, 'महंते' म्हणजे आजच्या भाषेत नेता/लिडर. ते म्हणतात की, नेत्याने दुसरे नेते तयार केले पाहिजेत. त्यांना 'युक्ती' म्हणजे आपल्या कामाची / Business ची Strategy तसेच बुद्धी म्हणजे ज्ञान-कौशल्य यांनी युक्त करून प्रेरित करावे / Motivate करावे (हा 'भरावे' या शब्दाला अर्थ आहे.) पुढे ते सांगतात असे लायक व 'जाणते' / ज्ञानी नेते तयार करून त्यांना अनेक देशात 'विखरावे' म्हणजे नेमावे / Appoint करावे व अशा अनेक लायक लोकांकडून भव्य व जगभर उत्तम कार्य करवून घेणे हे मोठ्या नेत्याचे काम आहे. हे सूत्र आपण पहाल तर जागतिक कंपनी यशस्वीपणे कशी चालवावी / आपले संघटन व्यापक / मोठे कसे होऊ शकते / जगात पसरू कसे शकते याचे एक सूत्रच समर्थांनी येथे दिले आहे. अर्थातच 'आधी केले आणि मग सांगितले' या त्यांच्या उक्तीनुसार त्यांनी स्वतः असे अनेक म्हणजे हजारो नेते / कर्तृत्ववान शिष्य त्याकाळी तयार केले व त्यांना भारतभर नेमून (११०० मठांवर) एक व्यापक, जणू काही जागतिक स्तरावरच कार्य केले असे म्हणता येईल. अत्यंत प्रतिकूल राजकीय व सामाजिक परिस्थिती असताना ज्या काळी दुसऱ्या गावी जाणे देखील अवघड होते, रस्ते, दळणवळण हे काहीच धड नव्हते. अशा काळी एवढे भव्य काम उभारणाऱ्या समर्थ रामदासांचे कर्तृत्व आजच्या काळात भारताला लाभले तर खरोखरच ते जगात काम उभे करू शकले असते व ते ही निस्वार्थीपणाचे व 'विवेकाचे'! त्यांना मिळालेली 'समर्थ' पदवी ही अशी-तशी मिळालेली नाही, हे दासबोधातील 'समर्थ' पदवी कशी मिळते हे सांगताना पुढील ओवीत स्पष्ट पहायला मिळते, ते म्हणतात की,

***''बहुत लोकांस चालवी । नाना मंडळे हालवी ।।***
***ऐसी ही 'समर्थ' पदवी । विवेके होते ।।***

अनेक / लक्षावधी लोकांना जो 'चालवतो' म्हणजे 'कार्यरत' करतो, 'नाना मंडळे' हालवी म्हणजे अनेक संघटनांच्या मागे जो सूत्रधार असतो, त्याला 'समर्थ' पदवी मिळते आणि ते काम देखील जो केवळ कर्तृत्वाने नव्हे, तर 'विवेकाने' करतो, तो 'समर्थ'/ विवेक हा आपल्या संस्कृतीतला खास शब्द आहे. 'विवेक' म्हणजे विचारपूर्वक वाईट/चांगले, सत्य/असत्य, न्याय/अन्याय, यातले चांगले /शुभ सत्य व न्याय्य, साऱ्यांच्या हिताचे/ शुभ असे विचारपूर्वक निवडून जो भव्य काम उभे करतो तो 'समर्थ'/ नेते तर खूप आहेत सध्या; पण 'समर्थ' शोधावा लागतो! आज त्याची आवश्यकता आहे.

**<u>समर्थांचा नेतृत्व आराखडा (Leadership Model)</u>**

**अ) सतत विकास साधणारा नेता :** समर्थांचा नेता हा सतत व कठोरपणे अहंकार बाजूला ठेवून, आत्मपरीक्षण करून, स्वतःचे दोष/अवगुण ओळखून ते बाजूला सारणारा व स्वतःचा सतत विकास साधणारा असा नेता आहे. सतत नव्या गोष्टी शिकून आत्मसात करणारा, अनेक गुण, ज्ञान व कौशल्ये यांनी जीवनाचा 'आंतरशृंगार करणारा' असा नेता, तसेच नि:स्वार्थी व भव्य कार्य करणारा नेता समर्थांना अपेक्षित आहे. म्हणूनच त्यांनी मूर्ख लक्षणे, पढतमूर्ख लक्षणे, कुविद्या लक्षणे, करंट लक्षणे असे अनेक समास दासबोधात

लिहिले आहेत. ते खरे म्हणजे प्रत्येकाने कठोर आत्मपरीक्षण करून आपल्यामध्ये ते अवगुण/दोष आहेत का? हे शोधून काढण्यासाठीच ! तसेच अनेक उत्तम गुण, नेतृत्वगुण त्यांनी 'उत्तम लक्षणे' महंत लक्षणे, नि:स्पृहव्याप लक्षणे अशा अनेक समासांमध्ये सांगितली आहेत. ते म्हणतात, ''तुमच्या महत्त्वाकांक्षा जर प्रत्यक्षात आणायच्या असल्या तर ते सांगतात - खूप कष्ट करा, झटा, भरपूर प्रयत्नशील रहा, झिजा, कीर्ती व यश हे झिजल्याशिवाय येत नाही.'' असे सांगताना ते म्हणतात,

***'झिजल्यावांचूनी कीर्ती कैंची । मान्यता नव्हे की फुकाची ।***
***जिकडे तिकडे होते ची ची । अवलक्षणे ॥***

पुढे ते सांगतात की, आपल्या मनातल्या महत्त्वाकांक्षा/ध्येये जर प्राप्त करायची असतील, तर दोष टाकले पाहिजेत व उत्तम गुण जीवनात उतरवले पाहिजेत, ती ओवी अशी -

***''या कारणे अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोन घ्यावे ।***
***तेणे मनासारिखे फावे । सकळ काही ॥***

'कळते पण वळत नाही त्याला 'समर्थ' 'पढतमूर्ख'/शिकलासवरलेला मूर्ख असे म्हणतात. त्यांचे म्हणणे

***सजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष झाले ॥***
***या वेगळे बोलचि राहिले । ते करंटे जन ॥***

नुसते ट्रेनिंग, वाचन, प्रवचन ऐकणे ह्याचा प्रत्यक्षात आचरणात आणले नाही, कृती केली नाही व दोष टाकले नाहीत, तर अशा माणसाला स्वत:चे हित/चांगले काय हे कळत नाही असेच म्हणावे लागेल. ते पुढील ओवीत म्हणतात.


***''रात्रंदिवस करी श्रवण । न सांडी आपुले अवगुण ।***
***स्वहित आपुले नेणे आपण । तो एक पढतमूर्ख ॥''***

त्याहीपुढे जे स्वत:च्या दोषांचे/अवगुणांचे समर्थन करतात, त्यांना सुधारायची काहीही शक्यता नाही असे समर्थ म्हणतात. ते असले स्वत:च्या दोषांचे समर्थन करून मोठे पाप करताहेत असे समर्थ म्हणतात. अशा वृत्तीला ते सगळ्यात मोठा दोष/अवगुण समजतात. या संबंधातील ओवी पुढील प्रमाणे-

***''सकळ अवगुणांमध्ये अवगुण । आपुले अवगुण वाटती गुण ।***
***मोठे पाप । करंटपण चुकेना की ॥***

त्यामुळे समर्थांना अपेक्षित असलेला नेता हा नुसता नेमलेला (Appointed Leader) नाही, तर जो सारे दोष, अहंकार बाजूला सारून अनेक गुणांनी, ज्ञानाने व स्वत:च्या कर्तृत्वाने सिद्ध झालेला व 'Walk Your Talk' या सूत्राने चालणारा नेता आहे.

नेतृत्वाचे अनेक गुण समर्थ सांगतात. तसेच नेत्याकडे 'आंतर-परीक्षा, सावधपणा, उत्तम वागण्या-बोलण्याची, (Interpersonal Skills), संवादाचे कौशल्य, भावनिक बुद्धीमत्ता, खूप कष्ट व प्रयत्न; पण केवळ खूप प्रयत्न नाहीत, तर 'अचूक' ज्ञान व कौशल्यावर आधारित प्रयत्न (Working Hard Working Smart) या पद्धतीचे प्रयत्न करणारा, उत्तम Delegation करणारा, असा नेता अपेक्षित आहे. या विषयी समर्थांच्या अनेक ओव्या आहेत. ज्यावर एक मोठे पुस्तक तयार होईल. काही नमुन्याच्या ओव्या आपण पाहू.



१) समर्थांचा प्रयत्नांवर इतका जबरदस्त भर आहे, की संत असून सुद्धा ते 'प्रयत्न हाच देव' असे प्रयत्नाला परमेश्वराचे स्वरूप देतात. तसेच कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत सकारात्मक असावा, असे सांगताना खालील ओव्या सांगतात -

***''केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।***
***यत्न तो देव जाणावा । अंतरी धारता बरे ॥***

तसेच केवळ खूप प्रयत्न नाही, तर 'अचूक' (Zero Defect) असे प्रयत्न केले तरच उत्तम यश मिळते, गुणवत्तेचे काम होते, नाहीतर काम 'सजत' नाही, यशस्वी होत नाही. असे सांगताना ते म्हणतात -

***''अचूक यत्न करवेना । म्हणून केले ते सजेना ।***
***आपला अवगुण जाणवेना । काही केल्या ॥***

जणू काही ते फिलिप्स क्रॉस्बी या अमेरिकन क्वालिटी गुरुचे Principle/तत्व ३५० वर्षांपूर्वी सांगताहेत. ज्याला आजच्या भाषेत आपण 'Do it Right, First time, every time' असे म्हणतो.

नेतृत्वविकासात सतत शिकणे व उरलेला सगळा वेळ समर्थांच्या भाषेत 'एक एक क्षण' हा वाया न घालवता ज्ञान/कौशल्ये संपादन करण्यात खर्च केला पाहीजे, की ज्याचा आपल्या व्यवसायात, नोकरीत व सांसारिक व्यवहारात यश व विकासासाठी उपयोग होईल. त्या संदर्भातील ही ओवी अशी पहा -

***''ऐक सदेवपणाचे (यशस्वी माणसाचे) लक्षण ।***
***रिकामा जाऊ नेदी येक क्षण ।***
***प्रपंच-व्यवसायाचे ज्ञान । बरे पाहे ॥***

लोकांना तुमच्या उत्तम गुणवत्तेच्या कामाने तुम्ही हवे-हवेसे वाटले पाहिजेत. तुमची त्यांना सारखी 'चटक' लागली पाहिजे. आठवण झाली पाहिजे असे म्हणताना ते सांगतात

***''काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ती उरवावी ।***
***'चटक लाऊनी सोडावी । काही येक ॥***
***''कष्टेविण फळ नाही । कष्टेविण राज्य नाही ।***
***केल्याविण होत नाही। साध्य जनी ॥***

प्रत्येक गोष्ट कष्टाने, प्रयत्नाने साध्य होणारी आहे, जगात अशक्य असे काही नाही, नशिबाने नव्हे, तर 'कष्टाने, ज्ञानाने, प्रयत्नाने व अचूक प्रयत्नाने माणूस यशस्वी व मोठा होतो. असा समर्थांचा संदेश आहे.

**<u>सहकाऱ्यांना उत्तम नेतृत्व व प्रेरणा देणारा नेता</u> :**

ब) याशिवाय दूरदृष्टी असणारा, न्याय्य वागणारा नेता हवा, आपल्या सहकाऱ्यांचा योग्य आदर, सन्मान करणारा, नेमके बोलणारा, हलक्या कानाचा नसणारा, पण चांगला Listener (Art of listening) अवगत असणारा (दुसऱ्यांना काम कसे सोपवायचे)(empowerment व Delegation कसे उत्तम करायचे) याचे बारकावे माहिती असणारा, खूप मोठे यश मिळवूनही नम्र असणारा, प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक व चिकित्सेने Analysis करून)

निर्णय घेऊन करणारा, नुसते Slogans न देता स्वतः तसे वागून लोकांना प्रेरणा देणारा, सत्याचा आग्रही, व्यापक व संयमी स्वभावाचा, अत्यंत व सर्वकाळ सावध असणारा इतरांना/सहकाऱ्यांना प्रशिक्षण/ज्ञान/अनुभव वाटणारा धूर्त, दूरदृष्टीचा व न्याय्य बोलण्याचे/संवादाचे, अनंत गुण असणारा, लोकांची मने व आत्मसन्मान सांभाळणारा व वाढविणारा, लोकांची उत्कृष्ट पारख असणारा, व्यवहारी, दक्ष व आर्थिक नियोजन दूरदृष्टीने व उत्तमपणे करणारा, वाद सोडविण्यात पटाईत असणारा, इतरांकडून सतत शिकणारा व विशेषतः 'जाणत्या' ज्ञानी/अनुभवी अशा व्यक्तीचे सहाय्य आपल्या कामासाठी व व्यवसायासाठी कसे घ्यावे याची उत्तम जाण असणारा व अशा तज्ज्ञ/ज्ञानी व्यक्तीकडून कष्टपूर्वक व अहंकार बाजूला ठेवून 'शहाणपण' शिकणारा असे उत्तम नेत्याचे अनंत गुण समर्थांनी दासबोधात अनेक ओव्यांमध्ये अत्यंत बारकाईने व तपशीलवार सांगितले आहेत. मी म्हटले तसे हा एक मोठ्या पुस्तकाचा विषय आहे. नेता हा Win - Win स्थिती निर्माण करतो, इतरांना तयार करतो, नवे नेतृत्व पुढे आणतो, संघटना बांधतो, वाढवतो व आपल्यानंतरही ती कायम उत्तम व वाढत्या यशस्वी रितीने चालेल असे संघटन बांधतो. - (Organisational development perpetualy of organisation)

<u>त्यातील काही गुण सांगणाऱ्या निवडक ओव्या आपण आता पाहू.</u>

***''दीर्घ सूचना आधी कळे। सावधपणे तर्क प्रबळे ।***
***जाणजाणोनी निवळे। यथा योग्य ।।***

दूरदृष्टीचा व त्याप्रमाणे सावधपणे योग्य पावले टाकणारा नेता.

***राखो जाणे नितिन्याय । न करी न करवी अन्याय।***
***कठीण प्रसंगी उपाय । करू जाणे ।।***

नीतिन्यायाची चाड असणारा व कठीण प्रसंगाला न डगमगता यशस्वीपणे तोंड देणारा नेता.

***आदर, सन्मान, तारतम्य जाणे । प्रयोग समयो, प्रसंग जाणे ।***
***कार्यकारण चिन्हे जाणे । विचक्षण बोलिका ।।***

लोकांना सन्मान देणारा व प्रयोगशील तसेच कार्यकारण भावाचे बारकावे समजणारा व नेमके बोलू शकणारा, सावध संवादी नेता.


***दक्ष, धूर्त, योग्य, तार्किक । सत्य, साहित्य नेमक, भेदक ।***
***कुशळ, चपळ, चमत्कारिक । नाना प्रकारे ।।***

अत्यंत बुद्धिमान, धूर्त पण न्याय्य, तसेच अनेक कौशल्ये, नेमकेपणा व भेदकपणा असणारा तसेच साहित्याचे अंग असणारा रसिक नेता तसेच नाना प्रकारचे चमत्कारीक / आश्चर्यकारक गुणांचे मिश्रण असणारा नेता.

***'विवादरहित संवादी'*** ज्याचा संवाद चालु असतो पण वाद न होऊन देण्याचे कौशल्ये असतात. असे अनेक गुण ते ठायी ठायी सांगतात.

***दुःख दुसऱ्याचे जाणावे । ऐकोन तरी वाटून घ्यावे ।***
***बरे वाईट सोसावे । समुदायाचे ।।***

नेत्याला भावनिक बुद्धिमत्ता हवी व उत्तम ऐकण्याची कला अवगत हवी. भावनिक संवेदना जागृत असणारा व दुसऱ्यांचे दुःख स्वतः होऊन ओळखून काही मदत करता येणे शक्य नसले, तर निदान ऐकून तरी दुःख वाटून घेणारा नेता हवा. ज्याला 'समुदायाचे' लोकांचे बरे-वाईट सोसायची तयारी नाही त्याने Leadership च्या भानगडीत पडू नये असे खरे म्हणजे समर्थांना सुचवायचे नाही ना?



***'मुख्य मनोगत राखणे । हेचि चातुर्याची लक्षणे'***

लोकांची मने राखणे हे नेत्याचे शहाणपणाचे प्रधान लक्षण आहे असे ते एका ठिकाणी म्हणतात.

कोणालाही दुखवू नये, लोकांच्या 'वर्मावर' चुकूनही बोट ठेवू नये तरच मोठा लोकसंग्रह होतो, मोठे नेतेपद किंवा 'दिग्विजय' (सरसकट विजय) होतो. असे सांगताना समर्थ 'वेड्याला सुद्धा वेडे म्हणू नये' असे म्हणतात. पुष्कळवेळेला आपण शहाण्यालाही वेड्यात काढतो. ही ओवी अशी

***''वेड्यास वेडे म्हणो नये । वर्म कदापि बोलो नये ।***
***तरीच घडै दिग्विजय । निस्पृहासी ।।***

याच संदर्भात लोकांना आपण कामाच्या ओघात दुखवले नाहीना याचे सतत क्षणाक्षणाला परीक्षण करून पुन्हा लोकांची मने सावरणे हा नेत्यांचा मोठा गुण या ओवीत ते सांगतात.

***कोण कोण राजी राखले । कोण कोण मनी भंगले ।***
***क्षणा क्षणा परिक्षले । पाहिजे लोक ।।***

'क्षणाक्षणा' राहीले बाजूला आपण महिनेंमहिने नव्हे वर्षानुवर्षे पहात नाही की आपल्यामुळे कोण दुखावले. राजकारण समासात ते म्हणतात की 'मेळवून घ्यावे दुरील दोरे। जे दुखावलेत त्यांना पुन्हा आपलेसे करून घेणे हे चतुर नेत्याचे लक्षण आहे असे ते सांगतात.

**<u>संघबांधणी (Team Building) कशी करावी. याच्यावर समर्थांच्या अनेक ओव्या आहेत. उदा.</u>**

***बहुत लोक मिळवावे । एक विचारे भरावे ।***
***समुदाय असावा मोठा । परि तणाव असाव्या बळकट।।***

संघटनेत खूप माणसे हवीत परंतु ते एका ध्येयाने/ विचाराने भारून टाकली पाहीजेत/प्रेरित असली पाहिजेत. त्याच वेळेला 'नुसता समुदाय मोठा असून किंवा संघटनेत खूप लोक असून चालणार नाहीत, तर त्यांचे Networking उत्तम व बळकट असणे आवश्यक आहे, असेही ते सांगतात.

संघटनेत लायक लोक शोधून काढून / निवडून नेमावेत व त्यांच्या योग्यतेचे काम त्यांना द्यावे तसेच त्यांना compensation व वागणूक ही त्यांच्या योग्यतेची द्यावी (flexi pay concept) असेही त्यांनी सांगितले आहे, या संबंधी ही ओवी.

***''बळकट लोक निवडावे। काम पाहोनि लावावे।***
***सगट मुशारे करावे। हे मूर्खपण।।***

'सगट मुशारे करावे' म्हणजे 'सब घोडे बाराटके' असे धोरण हा मूर्खपणा आहे, तर योग्यता व लायकीनुसार अधिकार व पगार द्यावा असेही ते सुचवितात.

***लोक बहुत शोधावे। त्यांचे अधिकार जाणावे।***
***जाणजाणोन धरावे। जवळ दूरी।।***

या ओवीतही ते Head-hunting करून चांगल्या लायक व्यक्ती शोधून, त्यांच्या योग्यतेनुसार संघटनेत त्यांना स्थान द्यावे असेच समर्थ सांगतात.

***कार्यकर्त्यास गमू देऊ नये। काम घेता त्रासू नये।***
***कठीण शब्द बोलू नये। क्षणोक्षणी।।***

काम करणाऱ्याला (कार्यकर्ता/ कर्मचारी) इकडेतिकडे वेळ घालवून देऊ नये, Timepass करू देऊ नये (गमू देऊ नये) हे सांगतानाच, काम करून घेणारे supervisior / managers यांचे कामच इतरांकडून काम करून घेणे असल्याने ते काम घेता किचकिच करू नये, त्रासो नये व सारखे घालून-पाडून बोलल्याने काम करणारा Demotivate होतो असे ते सुचवितात.

**Delegation किंवा Empowerment कशी करावी लोकांकडे काम सोपवून कसे करून घ्यावे या संबंधी ते सांगतात की -**

***अधिकार पाहोन कार्य सांगणे।***
***साक्षेप (सावधपणा/जबाबदारीची जाणीव) पाहोन विश्वास धरणे।***
***आपका मगज (महत्त्व) राखणे। काहीतरी।।***

Ability बघून व जबाबदारीची जाणीव पाहूनच काम विश्वासाने सोपवणे. शिवाय काहीतरी शेंडी आपल्या हातात ठेवावी (आपला मगज राखणे) असेही ते सांगतात. म्हणजेच Deligation केल्यानंतरही आपले त्या कामावर काहीतरी नियंत्रण हवे असे ते धूर्तपणे सांगतात.

Team work किंवा संघकार्य कसे करावे, ते करताना कसा दृष्टिकोन हवा हे खालील ओव्यात समर्थ सांगतात

***आडले जाकसले जाणावे। यथानूशक्ती कामास यावे।***
***मृदवचने बोलत जावे। कोणी येकासी।***

वागताना Pro-activeness असावा असे ते सुचवितात ते यातून की कोणाला काय अडचण आहे, मदत हवी हे Team member ने स्वतः होऊन पुढाकार घेऊन मदत केली पाहिजे. परंतु त्याचवेळी मदत केल्याचा अहंकार न दाखवता 'मृदवचनाने' गोड भाषेतच बोलावे असे सांगायलाही ते विसरत नाहीत. समर्थांच्या प्रत्येक वचनात किती खोल व मार्मिक अर्थ दडलेला असतो तो या व इतर सर्वच ओव्यात पाहायला मिळतो.


टिममध्ये काम करताना एकमेकांच्या सुखदुःखात सामील व्हायला पाहिजे व दुरावलेल्यांना सुद्धा चांगले बोलून पुन्हा संघात सामील करून घ्यायला हवे ते खालील ओवीत ते सांगतात

***दुसऱ्याचे दुःखे दुखवावे। परसंतोषे सुखी व्हावे।***
***प्राणीमात्रास मेळवून घ्यावे । बऱ्या शब्दे।।***

'माझे-तुझे' असे करत न बसता आपल्या संस्थेचे /कंपनीचे काम आहे, अशी भावना जागृत ठेवून संघभावनेने काम करणेच योग्य असे सांगताना ते म्हणतात -

***आपले अथवा परावे। कार्य अवघेच करावे।***
***प्रसंगी** (Exigency च्या वेळी) **कामास चुकवावें।***
***हे विहित (योग्य) नव्हे।।***

यापेक्षा आधुनिक विचार काय असू शकतात? आजच्या आधुनिक व औद्योगिक जगात modern management च्या संकल्पनामध्ये हीच नव्हे, तर समर्थांच्या अनेक /शेकडो ओव्या चपखल व नेमक्या लागू पडतात. हे सारे त्यांनी ३५० वर्षांपेक्षा ही पूर्वी लिहीले हे लक्षात घेतले तर त्यांना 'समर्थ' मोठा नेता/ नेत्यांचा नेता' पदवी कां मिळाली हे लक्षात येते.



win-win situation व्हावी व 'नाही रे' असणाऱ्या वर्गाला 'आहे रे' असणाऱ्या वर्गाने सहाय्य करून समाजात वर आणले पाहिजे अशी व्यापक दृष्टी समर्थ रामदासांची होती, ती पुढील ओवीत दिसते.

***बहुतांचे अन्याय क्षमावे। बहुतांचे कार्यभाग करावे।***
***आपल्यापरिस व्हावे पारखे जन।।***

' पारखे जन' म्हणजे समाजातल्या दलित/ मागासलेले हे आपल्या पुढारलेल्या समाजाच्या तोडीला/बरोबरीला येण्यासाठी, पुढारलेल्या समाजाने मदत केली पाहिजे असे सांगणारा हा न्याय्य, दूरदृष्टीचा व बहुजन समाजाचे हित पहाणारा नेता होता असे स्पष्ट पहायला मिळते.

कार्यसंस्कृती व व्यक्तिमत्व विकासावर तर समर्थांच्या शेकडो ओव्या आहेत. या ओव्यांवर यथावकाश मी पुस्तक लिहिण्याचे काम करीत आहे, हा एवढा व्यापक विषय आहे. काही थोड्या कार्यसंस्कृतीवरील व्यक्तिमत्व विकासाच्या ओव्या पाहून आपण हा विस्तारलेला लेख पूर्ण करू.

**कार्यसंस्कृती व व्यक्तीविकास संबंधी निवडक ओव्या**

माणूस करंटा/अयशस्वी का होतो हे त्यांनी अनेक ओव्यांमध्ये सांगितले आहे, त्यातील एक नमुना म्हणून पाहू ! ते म्हणतात

***विद्या नाही, बुद्धी नाही। विवेक नाही, साक्षेप नाही।***
***कुशलता नाही, व्याप नाही। म्हणोनी प्राणी करंटा।।***

ते म्हणतात, यशस्वी व्हायचे असेल, तर काहीतरी हवे. शिक्षण हवे अशिक्षित असला, तरी बुद्धीमत्ता चांगली हवी. ते नाही तर विवेक, विचारपूर्वक, न्याय्य, शुभ, सत्य वागायची सवय हवी, साक्षेप म्हणजे सावधपणा हवा, कौशल्य हवे, व्यवसायाचा व्याप वाढायला हवा असे काहीच नसेल, तर माणूस अपयशी/अयशस्वी ठरतो.

आळशीपणा, नुसती बडबड या साऱ्यांचा समर्थांना अत्यंत राग आहे. खूप व अचूक प्रयत्न करावे, आपल्या कामाचे व व्यवसायाचे सतत ज्ञान ग्रहण करावे, प्रत्येक काम सकारात्मक दृष्टिकोनाने करावे, कामात एकरुप व एकाग्र असायला हवे कामात तत्परता(promptness) हवी, 'बाते कम, काम जादा' हवे अशी शेकडो कार्यसंस्कृतीची तत्वे समर्थांनी सांगितली आहेत. त्यातील काही खालील ओव्यात आहेत.

***लहान थोर काम नाही। केल्या वेगळे होत नाही।***
***करंट्या सावध पाहीं । सदेव होसी।।***

ते म्हणतात 'करंट्या' /अयशस्वी माणसा तू सावधपणे व तत्परतेने कामे केलीस तर 'सदेव' (यशस्वी) होशील.

***केल्याने होत आहे रे। आधी केलेचि पाहिजे।***
***यत्न तो देव जाणावा। अंतरी धारता बरे।।***

प्रत्येक गोष्ट प्रयत्नसाध्य आहे, 'प्रयत्न हाच परमेश्वर' अशी मनाशी खूणगाठ बांधून सकारात्मक दृष्टीने काम केले की, यश मिळते असे समर्थ सांगतात. आळसावर ते तुटून पडतात-

***आळसे राहिला विचार । आळसे बुडाला आचार।***
***आळसे नव्हे पाठांतर । काही केल्या।।***
***आळसे नित्यनेम राहिला। आळसे अभ्यास बुडाला।***

***आळसे आळस वाढला। असंभाव्य।।***
***जे ही उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून ठेले।***
***येर ते बोलतचि राहिले। करंटे जन।।***

भरपूर कष्ट केले, त्यांनाच 'भाग्यप्राप्ती' झाली आहे व बडबड करीत राहिले व कृतिशून्य झाले ते सारे करंटे /अयशस्वी ठरले आहेत हे समर्थ ठामपणे व थेट सांगतात.

**व्यक्तिमत्व विकास :**

हिमनग जसा समुद्राच्या पाण्यात ७/८ असतो व दिसतो ते केवळ टोक १/८ तसे दिसणाऱ्या व्यक्तिमत्वापेक्षा आतमधले व्यक्तिमत्व हा मोठा (७/८) भाग आहे. हे व्यक्तिमत्व विकासातले आधुनिक तत्त्व समर्थांनी ३५० वर्षांपूर्वी सांगितले आहे ज्याला ते ''अंतरंग शृंगारणे'' असे म्हणतात ते खालील ओवीत-

***चातुर्ये (शहाणपण/कौशल्ये/चारित्र्य/गुण इ.) शृंगारे अंतर।***
***वस्त्रे शृंगारे शरीर।***
***दोहीमध्ये कोण थोर। बरे पहा।।***


'आतला शृंगार' महत्त्वाचा का बाहेरचा शृंगार महत्त्वाचा यातले 'जास्त महत्त्वाचे' काय असा आपल्यालाच सवाल करून ते अंतर्मुख करतात, अर्थात 'आतला शृंगार' म्हणजे आतमध्ये सद्‌गुण, कौशल्ये, हुशारी, शहाणपण, ज्ञान हे असणे 'जास्त महत्त्वाचे' हेच त्याचे उत्तर आहे. त्याचवेळी ते 'बाहेरच्या शृंगाराला अजिबात महत्त्व नाही असे म्हणत नाहीत, हे पाहिल्यावर त्यांच्या अलौकिक/सखोल अर्थांच्या ओव्यांचे अतिशय कौतुक वाटते व समर्थांविषयीच्या आदराने मस्तक झुकते.

विशेषतः विश्वसुंदरी स्पर्धा पाहताना समर्थांच्या या ओवीची आठवण येते. ती म्हणजे, ज्यावेळी पहिल्या 'बाह्यसौंदर्य' तपासणाऱ्या Rounds नंतर त्या निवडक स्त्रियांची, अनेक तज्ज्ञ, अनेकविध प्रश्न विचारून जी आतमधल्या चातुर्याची/सौंदर्याची चाचणी घेतात व त्या स्त्रीची बुद्धिमत्ता, हजरजबाबीपणा, सामाजिक जाणीव, शहाणपण, विचारक्षमता, संवादाचे कौशल्य हे तपासतात व त्यात यशस्वी होणाऱ्या स्त्रियांनाच Final Round मध्ये स्थान मिळते. माझ्या प्रशिक्षण वर्गात मी नेहमी हे उदाहरण देऊन सांगतो, की 'सौंदर्यस्पर्धांमध्ये देखील' आतल्या सौंदर्याला एवढे महत्त्व दिले जाते, तर आपण तर कोणत्याही 'सौंदर्य स्पर्धेत' नाही त्यामुळे आपल्याला 'आतले सौंदर्य/गुणवत्ता' याशिवाय पर्याय नाही! व्यक्तिमत्व विकासाच्या अनेक ओव्यांपैकी आणखी एक ओवी म्हणजे

***रुप लावण्य अभ्यासिता नये। सहजगुणास न चले उपाय।***
***काही तरी धरावी सोये। अगांतुक गुणांची।।***

'अगांतुक गुण' म्हणजे प्रयत्नपूर्वक साध्य केलेले। बाहेरून आलेले गुण (external qualities) समर्थ म्हणतात, की नैसर्गिक/जन्मतः गुणांना खूप मर्यादा आहेत, काही उपाय नाही. अर्थात, म्हणूनच गप्प न बसता अनेक गुण प्रयत्नपूर्वक आत्मसात केले, तरच चांगला व्यक्तिमत्व विकास किंवा नेतृत्वविकास होतो 'Leaders are not born' असाच संदेश समर्थांनी दिला आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा करून प्रत्येकाला व्यक्तिविकास व नेतृत्वविकासाला भरपूर वाव आहे, असे सांगणारा हा आगळावेगळा संत आहे.

सदर लेखात अनेक विषय व ओव्या तसेच समर्थांचे फार मोठे या विषयावरील विचारधन विस्तारभयास्तव आपण हाताळू शकलो नाही, मूर्खलक्षणे, पढतमूर्ख लक्षणे, कुविद्या लक्षणे, करंट लक्षणे असे अनेक महत्त्वाचे समास आपण पाहू शकलो नाहीत, की जे वेगळ्या लेखाचा विषय आहे. व्यक्तीमत्व विकासाच्या किंवा नेतृत्वविकासाच्या आड येणारा कोणता कोणता मुर्खपणा याची एक भली मोठी चेकलिस्ट/ यादीच समर्थांनी या समासांमध्ये केलेली आहे. हे सगळे पाहिले की, मन थक्क व समर्थांच्या अलौकीक विचारधनापुढे नतमस्तक होऊन जाते व खात्री पटते की 7 Habits of effective people किंवा तत्सम पुस्तकांवर अवलंबून न राहता, 'दासबोध' सारख्या ग्रंथाकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले व 'लिडरशिप व सेल्फ डेव्हलपमेंट' हे विषय प. पू. समर्थ संत रामदास स्वामींकडून शिकावेत, असे वाटल्याशिवाय रहात नाही. तसेच हे लक्षात आल्यावर भारतीय व त्यातही मराठी माणूस असल्याचा अभिमान व अस्मिता जागृत झाल्याशिवाय रहात नाही. म्हणून मी करतो त्या कार्यशाळांना मी 'Super Habits of Dasbodh' असेच नाव दिले आहे.



शेवटी सूत्रबद्ध रीतीने समर्थांच्या भाषेतच समारोप करायचा तर समर्थांनी एका ओवीत व्यक्तिविकास व नेतृत्वविकासाचे रहस्य सांगितले आहे. त्यात ते म्हणतात की, स्वतःचे दोष/अवगुण ओळखून त्याचा त्याग करणे ते सोडणे व अनेक उत्तम गुण समजावून घेऊन आपल्या जीवनात आत्मसात करणे, हेच ते रहस्य आहे व तरच आपल्या मनातल्या महत्त्वाकांक्षा /ईप्सित/ ध्येय साध्य होते असे ते खालील ओवीत म्हणतात, की ज्याने विस्तारित झालेल्या या लेखाला आपण पूर्णविराम देऊ!

***या कारणे अवगुण त्यागावे। उत्तम गुण समजोन घ्यावें***
***तेणे मनासारिखे फावे। सकळ काही।।***

तुमच्या सर्व महत्त्वाकांक्षा, मनातील सर्व स्वप्ने, त्या स्वप्नांना लागणारे गुण प्राप्त करून व त्या स्वप्नांच्या आड येणाऱ्या अवगुणांचा त्याग करूनच, प्रत्यक्षात उतरविणे शक्य आहे. हे अवगुण / दोष ओळखण्यासाठी एक महत्त्वाची सवय (Super Habit) आपल्यात हवी ती म्हणजे स्वत:ची अंतरंग परीक्षा, ती नसेल, तर आपण करंटे / अयशस्वी होतो असे ते म्हणतात.

***लोक नाना परीक्षा जाणती। अंतर परिक्षा नेणती।***
***तेणे प्राणी करंटे होती। संदेह नाही।।***

समर्थांच्या कृपेने आपण सारे हे करण्यात यशस्वी होऊ अशी मनीषा बाळगुन मी येथे थांबतो।

***।।जय जय रघुवीर समर्थ ।।***

***

**श्रीनिवास रायरीकर**
वरिष्ठ संचालक, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स
दूरध्वनी : (०२०) २४४४६३८
मोबाईल : ९४२२००४५१६
ईमेल : shriniwasr@mcciapune.com
spiritualmanagement@eth.net